# महाराष्ट्र राज्य वन धोरण-2008

# जळगांव जिल्हयासाठी 33% क्षेत्र वनव्याप्तीसाठी नियोजन आराखडा

## प्रस्तावना :-

राष्ट्रीय वननिति 1988 च्या धोरणास अनूसरुन राज्यात अधिका अधिक क्षेत्र वनाच्छादित करण्यासाठी **"महाराष्ट्र राज्याचे वन धोरण-2008"** ला महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर वन धोरणातील अनेक उद्दीष्टांसोबतच एकूण भौगोलिक क्षेत्राच्या 33% क्षेत्र हे वृक्षव्याप्तीखाली आणणे हे एक महत्वाचे व प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यासाठी जिल्हावार आराखडा तयार करण्याची जबाबदारी नोडल ऑफीसर म्हणून वनविभागाकडे सोपविण्यात आलेली आहे.

जिल्हावार योजना तयार करतांना वनेतर शासकीय/अशासकीय पडित जमीन, अनुत्पादक शेतजमीन, खाजगी जमीन, राष्ट्रीय व राज्य महामार्ग, रेल्वे व कालव्या लगतच्या जमीनी यावर वनीकरण घेण्याबाबतचा विचार करण्यात आला आहे. सदर योजना राबविण्यामध्ये महसुल विभाग, पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, कृषि विभाग, सामाजिक वनीकरण इत्यादी शासकीय यंत्रणा तसेच जिल्हापरिषद, महानगरपालिका इत्यार्दीसारख्या स्थानिक स्वराज्य संस्था याचा सहभाग घेण्यात येणार आहे.

## महाराष्ट्र राज्याचे वनधोरण-2008 मधील प्राथमिक उद्दिष्टये-

**1)** सामाजिक वानिकी व कृषी वानिकीद्वारे जनतेला विशेष करुन भूमिहीन दुर्बल घटक तसेच स्त्रीया यांना सहभागी करुन उपलब्ध सरकारी सामुहीक व खाजगी जमीनीवरील वनव्याप्ती मोठया प्रमाणात वाढविणे.

**2)** वनांवर विपरीत परिणाम करणारे जैविक घटक शोधून त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थानिक जनतेचा सहभाग घेतला जाईल, व त्याच बरोबर अशा अपप्रवृतींवर कायदेशिर कडक कार्यवाही केली जाईल.

**3)** वनांजवळ राहणा-या स्थानिक जनतेच्या दैनिक गरजा भागविण्यासाठी प्रामुख्याने इंधन, वैरण, व काष्ठ वनोपज व लहान लाकुड यांचा मागणीची पुर्तता करण्याच्या दृष्टींने वनीकरणाचे कार्यक्रम घेण्यावर विशेष भर दिला जाईल.

4) जळाऊ लाकूड, वैरण व अकाष्ठ वनोपज यांच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन गांव जमीनी तसेच सामुहीक जमिनी वृक्षाच्छादना खाली आणल्या जातील या कामी संबंधीत ग्रामपंचायतींना सामाजिक वनीकरण विभागातर्फे योग्य ते मार्गदर्शन केले जाईल. संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांना सक्रिय करुन या कामात स्वयंस्फुर्त सहभाग घेणे विषय प्रोहत्सान केले जाईल. जल-मृदसंधारण कामाद्वारे नदया, तलाव, जलाशयाच्या पाणलोट क्षेत्राची होणारी जमिनीची धूप थांबविणे व वेगात वाहणा-या पाण्याच्या प्रवाहांना

अडवून भुगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे, सर्व पडीत निकृष्ठ, अनुत्पादक जमिनीवर पुर्नवनिकरण करणे, अस्तीत्वात असलेल्या सर्व वनांचे आणि वनक्षेत्रांचे संपूर्ण संरक्षण करुन त्यांच्या उत्पादनात वाढ करणे तसेच संरक्षित किंवा बाहेरील वन्यजिवांनाचे संरक्षण करणे. किरकोळ जंगल उत्पन्नाचा विकास करणे, नैसर्गिक व मानव निर्मीत वनांची उत्पादकता वाढविण्यासाठी सुधारित लागवडीसाठी शास्त्रशुध्द तांत्रिक पध्दतीने मध्यवर्ती रोपवाटीका तयार करणे.

## जळगांव जिल्हा :-

पूर्वी **"पूर्व खान्देश"** या नावाने ओळखला जाणारा जळगांव जिल्हा तापी नदीच्या खो-यात महाराष्ट्र राज्याच्या वायव्य पूर्वेस $20^{o}$ ते $21^{o}$ उत्तर अक्षांश व $74^{o}55'$ ते $76^{o}28'$ ते पूर्व रेखांश या दरम्यान हा जिल्हा पसरलेला आहे. जळगांव जिल्हयाच्या उत्तरेस व इशान्येस मध्यप्रदेश राज्याच्या सीमा भिडतात, तर अग्नेय दिशेस बुलढाणा, तर दक्षिणेस औरंगाबाद, नैऋतेस नाशिक व पश्चिम वायव्येस धुळे जिल्हा यांच्या सिमा आहेत.

जळगांव जिल्हा दख्खन पठाराचा एक भाग असून विविधतेने नटलेला आहे. जळगांव जिल्हयाच्या उत्तरेस सातपुडा, नैऋतेस हटटी व दक्षिणेस अजिंठा (सातमाळा) अशा तीन पर्वतराजी पसरलेल्या आहेत. जिल्हयाची मुख्य नदी तापी ही पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहते, तीची लांबी जळगांव जिल्हयात 160 किलोमिटर आहे. तसेच 130 किलोमिटर लांबीची गिरणानदी चाळीसगांव, भडगांव, पाचोरा, एरंडोल, जळगांव तालुक्यांतून वाहते व पुढे ती तापी नदीस मिळते. तसेच जामनेर, भुसावळ तालुक्यातून वाघूर नदी वाहते. तसेच इतर अंजनी, बोरी, मोर या नदया एरंडोल, पारोळा, अंमळनेर व यावल या तालुक्यातून वाहतात, व पुढे तापी नदीस मिळतात. जिल्हयात एकूण 3 मोठे प्रकल्प असून गिरणा, हतनूर व वाघूर असून एकूण 14 मध्यम प्रकल्प आहेत.

## हवामान :-

जळगांव जिल्हयाचे हवामान सर्वसाधारणपणे पावसाळा वगळता उष्ण कोरडे आहे. जिल्हयात साधारणत: डिसेंबर महिन्यात कमी तापमाण ($10\ ^{o}$-8 से.) असते, तर मे महिन्यात सर्वाधिक ($45\ ^{o}$-2 से.) तापमान असते. जिल्हयात , नैऋत्य मोसमी वा-यांपासून जून ते सप्टेंबर या काळात सरासरी 638.13 मिलीमिटर पाऊस पडतो. पर्जन्यमान सर्वत्र सारखे नाही.

## जमीन :-

जळगांव जिल्हयात मुख्यत: जमिन काळी व कसदार, मध्यम काळी, जंगलक्षेत्र मुरुमयुक्त व रेताळ स्वरुपाचे आहे.

## जिल्हयातील वनविभागाची माहिती :-

जळगांव जिल्हयात एकूण 188861 हेक्टर वनक्षेत्र असून त्यात राखीव वन 18867 हेक्टर व संरक्षित वन 244 हेक्टर आहे. जळगांव जिल्हयात **यावल व जळगांव** असे दोन वनविभाग कार्यरत आहेत. तापी नदीच्या उत्तरेस चोपडा, रावेर, यावल असे तीन तालुके **यावल वनविभागात असून** उर्वरीत जळगांव, एरंडोल,

धरणगांव, पारोळा, अंम ळनेर, चाळीसगांव, भडगांव, पाचोरा, जामनेर, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर असे 12 तालूके **जळगांव वनविभागात** आहेत. जळगांव व यावल वनविभागात असलेली वनक्षेत्रांची तालुकावार माहिती खालील प्रमाणे आहे.

## वनसंपदा :-

वनविभागात प्रामुख्याने शक्यतो शुष्क पर्णीय दक्षिण विषुवृत्तीय वने (Southern Tropical Dry Deciduous Forests)असून महत्वाच्या वृक्ष प्रजातींमध्ये सागवान, सलई, धावडा, खैर, काकड, सादडा, अंजन, मोंडारा, कळंब, टेभुर्णी, कड, बिजा, मोदड, पळस आढळुन येतात. जळगांव जिल्हयात वने ही मुख्यत: गवताळ व झुडपी स्वरुपाची असल्याने मांसभक्षी व तृणभक्षी वन्यप्राण्यांची संख्या लक्षणीय आहे. वनक्षेत्रात वाघांची व बिबटयांची अस्तीत्वे आढळून आलेली आहेत. इतर प्राण्यांमध्ये तरस, कोल्हे, अस्वल, रानमांजरी, भेकर, काळविट, चितळ, चिंकारा, निलगाय, रानडूक्कर, मोर, इत्यादी विविध प्राणी, पक्षी व सर्प आढळून येतात.

जळगांव जिल्हयाचे एकुण भौगोलिक क्षेत्र 1163898 हेक्टर असून वन विभागाचे ताब्यात वन जमीनीचे क्षेत्र 188861हेक्टर आहे. त्याची टक्केवारी 16.23 असून कृषी विभागाने गत 10 वर्षात 15030 हेक्टर व सामाजिक वनीकरण विभागाचे 1980 हेक्टर वरील केलेले वनीकरण विचारात घेता एकूण जंगलव्याप्त क्षेत्र 205870 हेक्टर आहे. त्याची टक्केवारी 18 येते. महाराष्ट्र राज्याचे वनधोरण-2008 नुसार 33% क्षेत्र वृक्षाच्छादीत करण्यासाठी अजून 191996 हेक्टर हे वनेत्तर क्षेत्र वृक्षव्याप्तीखाली आणणे आवश्यक आहे. जळगांव जिल्हयात 1519 गावे व 15 तालुके असून तालुका निहाय भौगोलिक क्षेत्र, वनक्षेत्र तसेच वनव्याप्तीसाठी आवश्यक असलेले क्षेत्र इत्यादीची माहिती **तक्ता क्र.1** मध्ये दिलेली आहे.

## जिल्हयाचे 33% भौगोलिक क्षेत्र वृक्षाच्छादीत करण्यासाठी नियोजन आराखडा-

वर नमुद केल्याप्रमाणे जळगांव जिल्हयाचे एकूण 1163898 हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी जंगलव्याप्त क्षेत्र 205870 हेक्टर आहे. त्याची टक्केवारी 18 % इतकी आहे. याचा अर्थ एकूण भौगोलिक क्षेत्राच्या 33% पर्यंत क्षेत्र हे वृक्षाच्छादित करण्यासाठी 191996 हेक्टर वनेतर क्षेत्रावर वृक्षारोपनाचा कार्यक्रम घेणे क्रमप्राप्त आहे. या वनेतर क्षेत्रात शासकीय पडित जमीनत, खाजगी क्षेत्रातील पडीत जमिनी, शाळा, संस्था, रस्ते, लोहमार्ग इत्यादींच्या ताब्यातील जमिनींवर मोठया प्रमाणांवर वृक्ष लागवडीचा कार्यक्रम घेऊन उद्दिष्ट गाठता येणे शक्य आहे.

जिल्हयांत एकूण 18 % क्षेत्र जंगलव्याप्त असले तरी तालुकावार विचार करता वनाखालील क्षेत्राची टक्केवारी ही वेगवेगळया प्रमाणात दिसून येते. (तक्ता-2) त्यासाठी वृक्षारोपनाचे नियोजन करतांना तालुकावार 33% क्षेत्र वृक्षाच्छादित करण्यासाठी नियोजन करण्यात आलेले आहे.

वनविभागाचे एकुण क्षेत्र 188861 हेक्टर असले तरी सर्व क्षेत्र पुर्णत: वृक्षाच्छादित नाही, व त्यात विरळ झाडोरा असलेले अवनत वनक्षेत्रावर वृक्ष लागवडीचा कार्यक्रम घेण्यास वाव आहे. कार्यआयोजनेतील मार्गदर्शक सूचनांचा विचार करुन यावल व जळगांव वनविभागात 92122 हेक्टर क्षेत्रवर पुढील 5 वर्षात वृक्ष

रोपवनाचा कार्यक्रम प्रस्तावीत केला आहे. वनेतर क्षेत्रावर मोठया प्रमाणात वृक्ष लागवड कार्यकम घेण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाची समन्वयक म्हणून मोठी भूमिका राहिल. याशिवाय पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, कृषिविभाग या सारख्या शासकीय यंत्रणांची सुध्दा सहभागाची अपेक्षा राहील. त्यानुसार कृषी क्षेत्र, पाटबंधा-यांचे क्षेत्र, सार्वजनिक बांधकाम क्षेत्रावर काही प्रमाणावर वृक्ष लागवडीचा कार्यक्रम प्रस्तावीत केला आहे.

सध्या जिल्हयात 150764 हेक्टर वनेत्तर क्षेत्र हे शासकिय व खाजगी क्षेत्रात पडीत म्हणून आहे. 150764 हेक्टर क्षेत्रापैकी सूमारे 25% क्षेत्र वृक्ष लागवडीसाठी (गट लागवड) साटी उपलब्ध होऊ (37691हे.क्षेत्र)शकेल. सामाजिक वनीकरण विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाकडूनही रस्त्याचे क्षेत्र वृक्ष लागवडीसाठी प्रस्तावित केले आहे. यासाठी जिल्हयात राष्ट्रीय महामार्ग, प्रमुख राज्य महामार्ग, राज्य महामार्ग,प्रमुख जिल्हा रस्ते, इतर जिल्हा रस्ते , इत्यादींच्या 10988 कि.मी. लांबीपैकी 5200 कि.मी. लांबीचे रस्ते वृक्षव्याप्तीसाटी प्रस्तावित केलेले आहे.तरीही 33% क्षेत्र वृक्षाच्छादीत करण्यासाठी वनेत्तर क्षेत्र कमी पडेल, त्यासाठी खाजगी शेतींमध्ये मोठया प्रमाणात बांधांवर वृक्ष लागवडीस वाव आहे. व ते गरजेचे आहे. त्यासाठी 1000 रोपे बरोबर 1 नोशनल हेक्टर मानक घेवून 149096 हे. क्षेत्रावर बांधावरील वृक्ष लागवडीचा कार्यक्रम घेतला आहे. वनेत्तर पडीत जमीनीवर गट लागवड, बांधावरील वृक्ष लागवड तसेच रस्तादूतर्फा वनीकरणासाठी सामाजिक वनीकरण विभागाकडील मंजूर शासन दर पत्रकाचा आधार घेतला आहे.

33% क्षेत्र वृक्षाच्छादीत करण्यासाठी प्रस्तावित कार्यक्रम तयार करतांना उपवनसंरक्षक, जळगाव ,यावल, उपसंचालक, सामाजिक वनीकरण, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी ,जळगाव , वनक्षेत्रपाल सर्व यांची दिनांक 31.10.2009 रोजी सभा घेवून उद्दीष्टे प्रस्तावित केली आहेत.

वरीलप्रमाणे सविस्तर कार्यक्रम आराखडा तयार करण्यात आला असून वनेत्तर क्षेत्राची गाववार निश्चीत आकडेवारी उपलब्ध नसल्याने तसेच कार्यक्रमाचे अंमलबजावणीसाठी गाव स्तरावर कार्यान्वीत यंत्रणा नसल्याने तालुका स्तरावर उपलब्ध वनेतर क्षेत्राची आकडेवारी घेऊन तालुका स्तरावरील कार्यान्वीत यंत्रणाद्वारा प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येईल.

कार्यक्रम आराखडयानुसार सन 2010-11 ते 2014-15 ची 5 वर्षाचे कालावधीत एकूण 191996 हेक्टर क्षेत्रावर 1957.66 लाख रोपे लागवडीचा व रु.85994.42 लाख खर्चाचा कार्यक्रम तसेच वनक्षेत्राचे 92122 हेक्टर अवनत वन क्षेत्रावर 1013.34 लाख रोपे लागवडीचा व रु.32530 लाख असा एकुण2971 लाख रोपांचा व 121524.42 लाख खर्चाचा कार्यक्रम प्रस्तावीत करण्यात आलेला आहे.

एवढया वनेतर क्षेत्रावर वृक्ष लागवडीचा कार्यक्रम घेतांना शासकीय व पडीत जमिनीचे 178286 हेक्टर क्षेत्र वजा जाता 33% क्षेत्राचे उद्दिष्ट गाठण्यासाठी 191996 हेक्टर क्षेत्राची कमतरता भासेल. या क्षेत्राची उणीव भरुन काढण्यासाठी जळगांव जिल्हयात वहितीखालील क्षेत्र 892700 हेक्टर आहे. आजच्या स्थितीत जळगांव जिल्हयात वहितीखालील शेती बांधावरील ब-याप्रमाणात वृक्षराजी आहेत. तरीही शेतक-यांचा सहभाग घेऊन बांधावरचे वृक्ष लागवड घेण्यास प्रचंड वाव आहे. अश्या वृक्ष लागवडीचा कार्यक्रम घेऊन जिल्हयाचे 33% भौगोलिक क्षेत्र वृक्षाच्छादित सहज शक्य आहे. सामाजिक वनीकरण विभागामार्फत सर्व खाजगी शेतीबाधांवर

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत- महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत मंजुर आहे. यात लोकांचा ब-यापैकी प्रतीसाद आहे त्यासाठी व्यापक प्रमाणात चळवळ हाती घेऊन खाजगी क्षेत्र, शेत बांधावर वृक्ष लागवडीचा मोठा कार्यक्रम घेण्याचे प्रस्तावीत केले आहे. त्यासाठी शेत बाधांवर 1000 रोपे लागवड म्हणजे एक मानक हेक्टर क्षेत्र गृहीत धरुन 33% क्षेत्र व्याप्तीसाठी1957.66 लाख वृक्ष लागवडीचा म्हणजे 191996 हेक्टर क्षेत्राचा कार्यक्रम प्रस्तावीत केला आहे.

वर नमुद केलेल्या कार्यक्रमात वनेतर क्षेत्रावर सध्या अस्तीत्वात असलेल्या झाडांचा विचार केलेला नाही. करण जरी वर नमुद केलेले 33% चे उद्दिष्ट साध्य करावयाचे असले तरी अतिरिक्त झाडोरा हा निश्चितच पर्यावरणाच्या दृष्टीने Buffer Stock राहील. वृक्ष लागवडीचा कार्यक्रम करतांना सामाजिक वनीकरण विभागाकडील प्रचलीत दर पत्रकाचा आधार घेऊन आर्थिक व भौगोलिक उद्दिष्ट दाखविलेले आहे.

जळगांव जिल्हयाचे एकुण भौगोलीक क्षेत्र 1163898 हेक्टर असुन जंगलव्याप्त क्षेत्र 208570 हेक्टर आहे. या क्षेत्राची टक्केवारी 18 आहे. एकूण भौगोलिक क्षेत्राची विभागणी एकुण 15 तालुक्यांमध्ये झालेली असुन तालुकावार भौगोलीक क्षेत्र, जंगलव्याप्त क्षेत्र, वनक्षेत्राची टक्केवारी 33 % पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेले वनेत्तरक्षेत्र याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे**. तक्ता-3**

**तक्ता-3**

| **अ. क्रं.** | **तालुका** | **एकुण भौगोलीक क्षेत्र (हे.)** | **एकुण जंगल व्याप्त क्षेत्र** | **वनक्षेत्राची टक्केवारी** | **33% पुर्ण करण्यासाठी लागणारी टक्केवारी** | **आवश्यक वनेत्तर क्षेत्र (हे.)** |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** |
| 1 | चोपडा | 95436 | 40961 | 43 | 0 | 0 |
| 2 | यावल | 95438 | 35807 | 38 | 0 | 0 |
| 3 | रावेर | 93570 | 24781 | 26 | 7 | 6098 |
| 4 | मुक्ताईनगर | 64611 | 17069 | 26 | 7 | 4262 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 5 | बोदवड | 35545 | 3711 | 10 | 23 | 8019 |
| 6 | भुसावळ | 47470 | 6205 | 13 | 20 | 9460 |
| 7 | जळगांव | 82507 | 7150 | 9 | 24 | 20078 |
| 8 | एरंडोल | 49442 | 6073 | 12 | 21 | 10243 |
| 9 | धरणगांव | 48014 | 1005 | 2 | 31 | 14840 |
| 10 | अमळनेर | 84415 | 2408 | 3 | 30 | 25449 |
| 11 | पारोळा | 79121 | 12485 | 16 | 17 | 13625 |
| 12 | भडगांव | 48453 | 6059 | 13 | 20 | 9930 |
| 13 | चाळीसगांव | 121763 | 17072 | 14 | 19 | 23110 |
| 14 | पाचोरा | 82041 | 7207 | 9 | 24 | 19866 |
| 15 | जामनेर | 136072 | 17887 | 13 | 20 | 27017 |
| | **एकुण** | 1163898 | 205880 | 18 | 15 | 191996 |

जंगलव्याप्त क्षेत्राच्या एकुण क्षेत्र 205870 हेक्टर क्षेत्रा पैकी 92122 हे. क्षेत्र पडीत/अवनत गृहित धरल्यास त्या क्षेत्रावर वनविभागामार्फत रोपवन घेण्यांत येईल. कृषी विभागाने 1999-2000 ते 2008-09 या कालावधीत 15030 हे. क्षेत्रावर फळबाग योजना अंतर्गत फळ झाडांची लागवड केली आहे. राष्ट्रीय धोरणानुसार वनक्षेत्र 33 टक्के होण्यासाठी 15 टक्केवारी कमी आहे.

## जळगांव जिल्हयातील रस्त्यांची माहिती.

**जि.जळगांव** **लांबी कि.मी.मध्ये**

| अ. | बाब | रस्त्याचा प्रकार |
|---|---|---|

| क्रं. | | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग | प्रमुख जिल्हा रस्ते | इतर जिल्हा रस्ते | ग्रामिण रस्ते | इतर | एकुण लांबी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** |
| 1 | सिमेंट कॉक्रीट (न.पा/म.न.पा.) | - | - | - | - | - | - | 306 | 306 |
| 2 | डांबरी (सा.बा.वि.) | 184 | 96 | 1104 | 1283 | - | - | - | 2667 |
| 3 | खडीचे (सा.बा.वि.) | - | - | 12 | 81 | - | - | - | 93 |
| | खडीचे (जि.प.) | - | - | - | 86 | 538 | 2667 | - | 2791 |
| | खडीचे (म.न.पा.) | - | - | - | - | - | - | 224 | 224 |
| 4 | इतर माल वापरुन (सा.बा.वि.) | - | - | 62 | 48 | - | - | - | 109 |
| | इतर माल वापरुन (जि.प.) | - | - | - | 82 | 218 | 1684 | - | 1984 |
| | इतर माल वापरुन (न.पा./म.न.पा.) | - | - | - | - | - | - | 159 | 159 |
| 5 | एकुण लांबी (सा.बा.वि.) | 184 | 96 | 1177 | 1412 | - | - | - | 2869 |
| | एकुण लांबी (जि.प.) | - | - | - | 324 | 1835 | 4759 | - | 6918 |
| | एकुण लांबी (न.पा./म.न.पा.) | - | - | - | - | - | - | 1201 | 1201 |
| | **जिल्हा एकुण** | **184** | **96** | **1117** | **1736** | **1835** | **4759** | **1201** | **10988** |

वरील तक्त्यावरून , रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावण्याकरीता 5200 कि. मी. क्षेत्र उपलब्ध होईल. 1 कि. मी. बरोबर एक  हे. याप्रमाणे 5200 हे. क्षेत्र उपलब्ध होईल.

## <u>जळगांव जिल्हयातून जाणा-या रेल्वे मार्गाची माहिती.</u>

जळगांव जिल्हयातून जाणा-या मध्य व पश्चिम रेल्वेमार्गाची एकुण लांबी 350 कि.मी. आहे. ब्राडगेज लोहमार्गापैकी दुहेरी मार्ग 201 कि. मी. व एकेरी मार्ग 95 कि.मी. लांबीचे आहेत. धुळे चाळीसगाव लोहमार्गापैकी 24 कि.मी. मार्ग या जिल्हयात येतो. तसेच जळगाव सुरत या पश्चिम रेल्वे मार्गापैकी 71 कि.मी.मार्ग या जिल्हयात येतो. तसेच जिल्हयात पाचोरा जामनेर 54 कि.मी लांबीचा एकेरी लोहमार्ग नॅरोगेज प्रकारचा आहे. या जिल्हयात मध्य रेल्वे मार्गावर34 व पश्चिम रेल्वे मार्गावर 8 असे एकुण 42 स्थानके असुन सदर स्थानके खालील प्रमाणे 5 मार्गावर विभागले गेलेले आहेत.

1. चाळीसगांव ते धुळे
2. पाचोरा ते जामनेर
3. जळगांव ते सुरतकडे
4. चाळीसगांव ते ब-हाणपुरकडे
5. जळगांव ते नागपुरकडे

## जळगांव वनविभागातील मागिल 5 वर्षात झालेल्या  रोपवनांची माहिती

| अ.क्र. | वर्ष | लागवड वर्ष | क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** |
| 1 | 2009-10 | 2009 | 1636.20 | |
| 2 | 2008-09 | 2008 | 523.00 | |
| 3 | 2007-08 | 2007 | 489.60 | |
| 4 | 2006-07 | 2006 | 614.00 | |
| 5 | 2005-06 | 2005 | 650.00 | |
| 6 | 2004-05 | 2004 | 1028.54 | |
| एकूण | | | **4941.34** | |